**श्री.प्रकाश एस. पाटील, उप जिल्हाधिकारी यांना जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन आदेश क्र:- प्रतिनि-२३२५/प्र.क्र.२११/ना.पु.१५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक :- ११ फेब्रुवारी, २०२६.

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे) नियम, १९८१.
२) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/का-१२, दि.१७.१२.२०१६.
३) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/का-१२, दि.१६.०२.२०१८.
४) शासन अधिसूचना, अ.ना.पु.व ग्रा.सं.वि., सेप्रनि-१२२०/प्र.क्र.१४०/ना.पु.१५,दि.२७.०३.२०२३.
५) या विभागाचे शासन पत्र, समक्रमांक, दि.१५.१०.२०२५.
६) महसूल व वन विभाग, शासन पत्र क्र. प्रतिनी -१२२५/प्र. क्र.२८३/आस्था-०२,दि.१९.०१.२०२६.

**प्रस्तावना :**

शासन निर्णय, सा.प्र.वि., दि.१७.१२.२०१६ नुसार शासकीय अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती आणि नियुक्तीची कार्यपद्धती याबाबतचे धोरण ठरविण्यात आले असून शासन निर्णय, सा.प्र.वि., दि.१६.०२.२०१८ अन्वये दि.१७.१२.२०१६ च्या धोरणामध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

२. शासन अधिसूचना, अ.ना.पु.व ग्रा.सं.वि., दि.२७.०३.२०२३ अन्वये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, क्षेत्रिय पुरवठा यंत्रणेतील, जिल्हा पुरवठा अधिकारी, गट-अ संवर्गाचे सेवा प्रवेश नियम सुधारित करण्यात आले आहेत.

३. उपरोक्त परी. क्र. १ व २ नुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया हे पद प्रतिनियुक्तीने भरणेबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश :-**

**श्री.प्रकाश एस. पाटील, उपजिल्हाधिकारी** यांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्याखालील **जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया** या पदावर **२ वर्षांच्या कालावधीसाठी** प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतून काढून टाकणे) नियम, १९८१ च्या नियम-४० मधील परिशिष्ट-२ मधील विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात येत आहे.

३. श्री.प्रकाश एस. पाटील यांची प्रतिनियुक्ती ही प्रतिनियुक्तीच्या पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून २ वर्षांच्या कालावधीकरीता खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे:-

१) श्री.प्रकाश पाटील यांची प्रतिनियुक्तीच्या पदावरील सेवा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास आवश्यक वाटली नाही तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांच्या

सेवा मूळ महसूल व वन विभागास प्रत्यावर्तित करण्यात येतील व त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागास राहील.

२) श्री.प्रकाश पाटील यांच्या सेवेची महसूल व वन विभागाला आवश्यकता वाटल्यास त्यांना प्रतिनियुक्ती कालावधी संपण्यापूर्वी परत बोलाविण्याचा अधिकार महसूल व वन विभागास राहील.

३) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा उद्देश असल्याबाबत या विभागास कळविल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत जाण्याची मुभा राहील.

४. सदर आदेश तात्काळ अंमलात येत असून श्री.प्रकाश एस. पाटील, उप जिल्हाधिकारी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया या प्रतिनियुक्तीच्या पदी तात्काळ रुजू व्हावे.

५. सदर शासन आदेशान्वये श्री.प्रकाश एस.पाटील, उप जिल्हाधिकारी हे जिल्हा पुरवठा अधिकारी, गोंदिया या पदावर रुजू झाल्यानंतर, त्याबाबतचा रुजू अहवाल उप आयुक्त (पुरवठा), नागपूर विभाग यांनी napu१५.mhpds@gov.in या ई-मेलवर शासनास कळवावा.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२६०२१११२००४३७९०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.02.11 12:02:12 +05'30'

**( प्रमोद पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) अपर मुख्य सचिव, (महसूल), महसूल व वन विभाग मंत्रालय, मुंबई.
२) श्री. प्रकाश एस. पाटील, उप जिल्हाधिकारी.

**प्रत :-**

१) मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अप्पर मुख्य सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
४) जिल्हाधिकारी, गोंदिया.
५) उप आयुक्त (पुरवठा), नागपूर विभाग, नागपूर.
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१ /२, मुंबई /नागपूर.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया .
८) उप सचिव (ई-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, अ.ना.पु.व ग्रा.सं.वि., मंत्रालय, मुंबई.
१०) निवडनस्ती, ना.पु.१५.